सत्कार साहित्याचे एकमेव फेमस ठिकाण
SNB
S NAPKIN BOUQUET
S नॅपकिन बुके हाऊस कामोठे
आता आनंद मिळवा समारंभाच्या नंतरही
कॅटलॉग 8097549054 वेबसाईट

महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक
RNI : MAH/MAR/2011/40762
पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in
E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : २५, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप मंगळवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२६ ते १० ऑगस्ट २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## धनुष्यबाण आपलाच; २०२९ च्या तयारीला लागा ! – उद्धव ठाकरे यांचे पदाधिकाऱ्यांना आदेश

मुंबई(भीमराव धुळप) : शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी निर्णायक टप्प्यात असून न्यायालयाचा निर्णय आपल्या बाजूने लागेल, असा विश्वास व्यक्त करत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना आगामी निवडणुकांच्या तयारीला तातडीने लागण्याचे आदेश दिले.

शिवसेना भवन येथे शनिवारी झालेल्या जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुखांच्या बैठकीत पक्षसंघटना, सर्वोच्च न्यायालयातील प्रकरण तसेच आगामी निवडणुकांच्या रणनीतीवर सविस्तर चर्चा झाली. ठाकरे यांनी २०२९ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी आतापासूनच संघटनात्मक तयारी सुरू करण्याच्या सूचना दिल्या.




पक्षबांधणीला सर्वोच्च प्राधान्य देत नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच विशेष मतदार नोंदणी अभियान (एसआयआर) प्रभावीपणे राबवून ८ ऑगस्टपर्यंत पात्र मतदारांची नोंदणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. एकाही पात्र मतदाराचे नाव यादीतून वगळले जाणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

आगामी ग्रामपंचायत निवडणुका लक्षात घेऊन तळागाळातील संघटना अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला. संघटनात्मक कामात हलगर्जीपणा करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर कारवाईचा इशाराही ठाकरे यांनी दिला. जबाबदारी प्रभावीपणे पार पाडता येत नसेल, तर पदाचा आग्रह न धरता इतर जबाबदारी स्वीकारावी, असे स्पष्ट करत त्यांनी पक्षबांधणी अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

## जनतेचा पैसा जनतेसाठीच
### इनोव्हा प्रस्तावावर मुख्यमंत्र्यांची नाराजी



मुंबई : राज्य शासनाच्या विविध विभागांसाठी इनोव्हा गाड्या खरेदी करण्याच्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून समोर आली आहे. जनतेच्या पैशाचा वापर अनावश्यक खर्चासाठी न करता विकासकामे, मूलभूत सुविधा आणि लोकहिताच्या योजनांसाठी प्राधान्याने व्हावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्याचे सूत्रांनी सांगितले.

सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित प्रस्ताव सभागृह नेते गणेश खणकर यांनी मांडला होता. मात्र, या प्रस्तावावर विरोधकांसह विविध स्तरांतून टीका झाल्यानंतर त्यावर पुनर्विचार करण्यात आला. वाढत्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर अखेर हा प्रस्ताव मागे घेण्यात आल्याचे समजते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनाने खर्चात काटकसर करत लोकाभिमुख निर्णयांना प्राधान्य द्यावे, असा संदेश दिल्याचीही चर्चा आहे. सार्वजनिक निधीचा प्रत्येक रुपया नागरिकांच्या कल्याणासाठी आणि विकासासाठी खर्च होणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी घेतल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान, इनोव्हा गाड्या खरेदीचा प्रस्ताव मागे घेतल्यानंतर या प्रकरणाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली असून, खर्चाबाबत सरकारच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, याबाबत शासनाकडून अधिकृत भूमिका किंवा निवेदन अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही.

## उच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर बीएमसी ॲक्शन मोडमध्ये
### कचरा फेकणाऱ्यांवर सीसीटीव्हीद्वारे नजर, कठोर दंडात्मक कारवाई

मुंबई : माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनंतर बृहन्मुंबई महानगरपालिका (बीएमसी) प्रशासनाने शहरातील दृश्यमान स्वच्छता अधिक प्रभावी करण्यासाठी व्यापक मोहीम हाती घेतली आहे. कचरा साचणाऱ्या संवेदनशील ठिकाणांवर (GVP) सीसीटीव्ही कॅमेरे बसवून निगराणी ठेवली जाणार असून, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त श्रीमती अश्विनी भिडे यांनी सर्व वॉर्ड कार्यालयांना बाजारपेठा, मुख्य रस्ते, पदपथ, सार्वजनिक ठिकाणे, समुद्रकिनारे, नाले आणि जलस्रोत परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. कचरा साचणाऱ्या 'हॉटस्पॉट्स'चे




डिजिटल मॅपिंग करून त्यांचे कायमस्वरूपी निर्मूलन करण्यासाठी जनजागृती, सेवा सुधारणा, सीसीटीव्ही निगराणी आणि दंडात्मक कारवाईचा अवलंब केला जाणार आहे.

याशिवाय शाळा, रुग्णालये, रेल्वे व मेट्रो स्थानके तसेच बाजारपेठांजवळील पदपथांवरील अतिक्रमणे तातडीने हटवून नागरिकांसाठी चालण्यायोग्य पदपथ उपलब्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अनधिकृत बांधकामांवर त्वरित कारवाई तसेच 'मार्ग' ॲपवर प्राप्त खड्ड्यांच्या तक्रारींचे प्राधान्याने निराकरण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

दृश्यमान स्वच्छता ही प्रशासनासह प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगत, स्वच्छ, सुंदर आणि निरोगी मुंबई घडविण्यासाठी नागरिकांनीही सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त अश्विनी भिडे यांनी केले.

## 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात मुंबईत श्रींच्या आगमनाला सुरुवात

मुंबई : गणेशोत्सवाला अद्याप महिन्याहून अधिक कालावधी शिल्लक असला, तरी मुंबईत बाप्पाच्या आगमनाची उत्साहपूर्ण चाहूल लागली आहे. रविवारी (दि. २) शहरातील अनेक सार्वजनिक गणेश मंडळांनी पारंपरिक व भक्तिमय वातावरणात श्रींच्या आगमन



सोहळ्याला प्रारंभ केला. ढोल-ताशांचा दणदणाट, भगव्या पताकांची सजावट आणि "गणपती बाप्पा मोरया"च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

यंदा १४ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थी साजरी होत असून, त्याच्या तयारीला मुंबईत वेग आला आहे. विशेषतः लालबाग-परळ परिसरातील नामांकित गणेश मंडळांमध्ये बाप्पाच्या मूर्तींचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. फुलांची उधळण, ढोल-ताशांचा गजर आणि भक्तांच्या जल्लोषात मूर्ती मंडळांकडे नेण्यात आल्या.

प्रत्येक वर्षाप्रमाणे यंदाही आगमन सोहळ्यासाठी हजारो गणेशभक्तांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली. गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी विविध मंडळांकडून सजावट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांचे नियोजन सुरू झाले असून, संपूर्ण मुंबई हळूहळू गणेशमय वातावरणात रंगू लागली आहे.

## सिद्धिविनायक मंदिराच्या दानपेटीतून '१८ कोटींच्या संभाव्य अपहाराचा' आरोप;
### विश्वस्तांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र, चौकशीची मागणी

मुंबई : प्रभादेवी येथील प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक गणपती मंदिराच्या दानपेटीतील रकमेबाबत गंभीर आरोप समोर आले आहेत. मंदिराच्या एका विश्वस्ताने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून दानपेटीतील रकमेचा संभाव्य अपहार झाल्याचा संशय व्यक्त करत सखोल चौकशीची मागणी केली आहे. या पत्रात दरवर्षी सुमारे १८ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र, या आरोपांची अधिकृत चौकशीनंतरच सत्यता स्पष्ट होणार आहे.

विश्वस्तांच्या पत्रानुसार, काही दिवसांपूर्वी मंदिरातील दानरकमेच्या चोरीप्रकरणी नऊ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. दानरकमेची मोजणी दर बुधवारी केली जाते. संबंधित कर्मचाऱ्यांना पकडण्यापूर्वी आठवड्याला दानपेटीत सुमारे ५० लाख रुपये जमा होत असल्याचे दिसून येत होते. मात्र, आरोपी कर्मचाऱ्यांवर



कारवाई झाल्यानंतर सलग तीन आठवड्यांत ही रक्कम वाढून सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा दावा पत्रात करण्यात आला आहे.

या फरकामुळे यापूर्वी दानपेटीतील काही रक्कम लंपास होत असल्याचा संशय विश्वस्तांनी व्यक्त केला आहे. त्यानुसार, दरवर्षी सुमारे १८ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याची शक्यता असून या प्रकरणात वरिष्ठ स्तरावरील व्यक्तींचाही सहभाग असू शकतो, असा संशय पत्रात नोंदविण्यात आला आहे.

प्रभादेवीतील श्री सिद्धिविनायक मंदिर हे देशातील सर्वाधिक श्रद्धास्थानांपैकी एक मानले जाते. दररोज हजारो भाविक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर येथे दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे मंदिराच्या दानरकमेबाबत उपस्थित झालेल्या या गंभीर आरोपांमुळे भाविकांमध्येही चिंता व्यक्त होत आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित यंत्रणांकडून अधिकृत चौकशी झाल्यानंतरच आरोपांचे सत्य स्वरूप स्पष्ट होणार आहे. त्यामुळे चौकशी अहवाल येईपर्यंत या दाव्यांकडे आरोप म्हणूनच पाहणे आवश्यक आहे.

## संपादकीय

# पीओपीच्या गणेशमूर्तींवरील बंदी हटणार ?

प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) गणेशमूर्तींवरील बंदीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मुंबई उच्च न्यायालयातील सुनावणी, राज्य सरकारची सावध भूमिका आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शाडूच्या मातीच्या मूर्तींचा केलेला पुरस्कार यामुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. यंदाच्या गणेशोत्सवापूर्वी या प्रश्नावर नेमका काय निर्णय होणार, याकडे मूर्तिकार, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि गणेशभक्तांचे लक्ष लागले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारला स्पष्ट शब्दांत विचारले की, पंतप्रधान स्वतः सातत्याने शाडूच्या मातीच्या मूर्तींचे आवाहन करत असताना राज्य सरकारची भूमिका नेमकी काय आहे? त्यावर सरकारने सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून भूमिका जाहीर करू, असे सांगितले. त्याचवेळी न्यायालयाने सार्वजनिक मंडळांकडून पूजेसाठी लहान मूर्ती वापरल्या जात असल्याने मोठ्या पीओपी मूर्तींचे नैसर्गिक जलाशयात विसर्जन करण्याऐवजी त्यांची पुनर्प्रक्रिया करण्याचा पर्याय अधिक योग्य ठरू शकतो, असे मत व्यक्त केले.

महाराष्ट्रात पीओपी मूर्तींचा प्रश्न केवळ पर्यावरणाचा नाही, तर तो मोठ्या आर्थिक साखळीशी जोडलेला आहे. हजारो मूर्तिकार, कारागीर, रंगकाम करणारे आणि वाहतूक व्यवसाय यांचे उत्पन्न या उद्योगावर अवलंबून आहे. विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक आणि कोकणातील सार्वजनिक मंडळांमध्ये उंच गणेशमूर्तींची परंपरा रुजली असून, अशा भव्य मूर्ती शाडूच्या मातीमध्ये तयार करणे तांत्रिकदृष्ट्या कठीण मानले जाते. त्यामुळे पीओपीचा वापर वाढत गेला.

दुसरीकडे, पर्यावरणवादी संघटनांचा मुद्दा तितकाच महत्त्वाचा आहे. पीओपी पाण्यात सहज विरघळत नाही. विसर्जनानंतर अनेक मूर्ती समुद्रकिनाऱ्यावर किंवा जलाशयात पडून राहतात. त्यांच्या लोखंडी सळ्या काढण्यासाठी होणारी विटंबना आणि प्रदूषणाची समस्या वारंवार समोर आली आहे. याच कारणामुळे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (सीपीसीबी) २०२० मध्ये कठोर मार्गदर्शक तत्त्वे लागू केली. मात्र महाराष्ट्रात त्यांची प्रभावी अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही.

सुनावणीदरम्यान पीओपी मूर्तिकारांच्या वतीने शाडूच्या मातीमुळेही गाळ तयार होतो आणि प्रदूषणाला रंग अधिक कारणीभूत ठरतात, असा युक्तिवाद करण्यात आला. मात्र या दाव्याला शास्त्रीय आधार आहे का, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. त्यामुळे अंतिम निर्णय वैज्ञानिक पुरावे, पर्यावरणीय अभ्यास आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊनच होणे आवश्यक आहे.

खरे पाहता हा वाद श्रद्धा आणि पर्यावरण यांच्यातील संघर्ष म्हणून पाहण्याची गरज नाही. पर्यावरणपूरक रंगांचा वापर, कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन, मोठ्या मूर्तींची पुनर्प्रक्रिया आणि मूर्तिकारांना पर्यायी तंत्रज्ञानासाठी आर्थिक मदत अशा उपाययोजना राबवल्यास पर्यावरणाचेही रक्षण होईल आणि परंपराही टिकून राहील.

आता राज्य सरकारसमोर खरी कसोटी आहे. पंतप्रधानांच्या आवाहनाचा सन्मान, न्यायालयाच्या सूचनांचे पालन, पर्यावरणाचे संरक्षण आणि हजारो मूर्तिकारांच्या उपजीविकेचा समतोल साधणारे धोरण सरकारने जाहीर करणे आवश्यक आहे. पीओपीवरील बंदी कायम ठेवायची की सुधारित अटींसह मार्ग मोकळा करायचा, हा निर्णय काहीही असो; तो वैज्ञानिक, व्यवहार्य आणि सर्वसमावेशक असणे हीच काळाची गरज आहे.

# 'ड्रग फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ; नशामुक्तीचा लढा देशाच्या भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प – मुख्यमंत्री

मुंबई : अमली पदार्थांविरोधातील लढा हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा विषय नसून देशाच्या भविष्यासाठीचा सामूहिक लढा आहे. त्यामुळे 'ड्रग फ्री मुंबई', 'ड्रग फ्री महाराष्ट्र' आणि 'ड्रग फ्री भारत' घडविण्यासाठी शासनासह समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वरळी डोम येथे आज 'ड्रग फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा नशामुक्ती जनजागृती अभियानाच्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष मंगलप्रभात लोढा, मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, वैद्यकीय तज्ज्ञ, समुपदेशक, विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भारत विज्ञान, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अंतराळ संशोधनात झपाट्याने प्रगती करत असताना युवा शक्तीला अमली पदार्थांच्या विळख्यात अडकविण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. त्यामुळे ड्रग्सविरोधातील लढा हा प्रत्येक नागरिकाने स्वतःचा समजून लढण्याची गरज आहे.

शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अमली पदार्थांची विक्री करणाऱ्या टोळ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल. पोलीस, आरोग्य, सामाजिक न्याय, शिक्षण विभाग, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या समन्वयातून अमली पदार्थमुक्त समाज घडविण्याचा निर्धार शासनाने केला आहे.

### 'ड्रग फ्री मुंबई' ही लोकचळवळ बनवूया – मंत्री मंगलप्रभात लोढा

मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले की, 'ड्रग फ्री मुंबई' हे केवळ शासनाचे अभियान नसून समाजाच्या सक्रिय सहभागातून उभी राहणारी व्यापक जनचळवळ आहे. मुंबई पूर्णपणे अमली पदार्थमुक्त होईपर्यंत ही मोहीम सातत्याने राबविण्यात येईल. प्रत्येक नागरिकाने सामाजिक जबाबदारी म्हणून या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

राज्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक आणि महाविद्यालयांचे प्राचार्य यांना मार्गदर्शक सूचना पाठविण्यात येणार असून 'ड्रग फ्री कॅम्पस' आणि 'ड्रग फ्री स्कूल' ही संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. ड्रग्सविषयी माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवली जाईल तसेच उपयुक्त माहिती देणाऱ्यांना पुरस्कारही दिले जातील, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

व्यसनाधीन युवकांचे पुनर्वसन करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यावर शासनाचा विशेष भर राहणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी युवकांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता व्यसनांना ठाम नकार द्यावा, असे आवाहन केले. तसेच पुढील दोन ते चार वर्षांत **'ड्रग फ्री मुंबई'** चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणेने अमली पदार्थमुक्त समाज घडविण्याची सामूहिक शपथ घेतली.

# पुणे शिक्षक मतदारसंघातून मंगेश चिवटे यांच्या उमेदवारीसाठी पूर्ण ताकद लावणार; शहाजीबापू पाटील



सांगोला : पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगेश चिवटे यांच्या प्रचार शुभारंभ सोहळ्यात आमदार शहाजीबापू पाटील यांनी त्यांच्या उमेदवारीला जाहीर पाठिंबा दर्शविला. शिवसेना-भाजप जागावाटपात पुणे शिक्षक मतदारसंघ शिवसेनेकडे यावा आणि त्या मतदारसंघातून शिवसेनेच्या वैद्यकीय कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांना उमेदवारी मिळावी, यासाठी पक्षाचे सर्व मंत्री, आमदार व पदाधिकारी पूर्ण ताकदीने प्रयत्न करतील, असे त्यांनी स्पष्ट केले. शहाजीबापू पाटील म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे निकटवर्तीय असलेले मंगेश चिवटे यांनी आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत हजारो गरजू रुग्णांना मदत केली आहे. शिक्षकांच्या विविध प्रश्नांवरही त्यांनी सातत्याने आवाज उठवून विश्वासार्ह नेतृत्व निर्माण केले आहे. त्यामुळे शिक्षकांचे प्रभावी प्रतिनिधित्व करण्यासाठी त्यांना संधी मिळावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या घोषणेला उपस्थित शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या राजकीय समीकरणांमध्ये या वक्तव्याची चर्चा रंगू लागली आहे.

# खड्डेच खड्डे... विकासाचा रस्ता नेमका कुठे ?

पावसाळा सुरू झाला की राज्यभर रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर येतो. मुंबई, ठाणे, पुणे, नाशिकसह ग्रामीण भागातील अनेक रस्ते खड्ड्यांनी व्यापले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वार, रुग्णवाहिका, शालेय बस आणि सामान्य नागरिकांसाठी हे रस्ते मृत्यूचे सापळे ठरत आहेत. नाशिकसह अनेक ठिकाणी खड्ड्यांमुळे झालेल्या अपघातांत निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला आहे.

दरवर्षी रस्ते बांधणी व दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होतो, तरी काही महिन्यांतच रस्ते उखडतात. यामागे निकृष्ट दर्जाची कामे, भ्रष्टाचार आणि प्रशासनाची निष्काळजी वृत्ती हीच प्रमुख कारणे असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. तात्पुरत्या डागडुजीऐवजी दोषी ठेकेदारांना काळ्या यादीत टाकणे, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणे आणि निकृष्ट कामाचा खर्च वसूल करणे आवश्यक आहे. दर्जेदार, टिकाऊ आणि सुरक्षित रस्ते हेच खऱ्या विकासाचे प्रतीक आहेत; अन्यथा "खड्डेमुक्त महाराष्ट्र" ही घोषणा केवळ कागदावरच राहील.

**- श्याम ठाणेदार लेखक**

# मोबाईल रिचार्ज दरवाढीने सर्वसामान्य हैराण; सरकारने हस्तक्षेप करण्याची नागरिकांची मागणी

मुंबई : मोबाईल सेवा पुरविणाऱ्या प्रमुख दूरसंचार कंपन्यांच्या रिचार्ज दरांमध्ये झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्य ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मोबाईल क्रमांक सक्रिय ठेवण्यासाठीच आता किमान सुमारे □299 ते □301 खर्च करावा लागत असल्याची तक्रार अनेक ग्राहकांकडून केली जात आहे. त्यामुळे वाढत्या महागाईच्या काळात हा अतिरिक्त आर्थिक बोजा नागरिकांवर पडत असल्याचे मत व्यक्त होत आहे.

ग्राहकांचे म्हणणे आहे की, यापूर्वी □99 किंवा □199 च्या रिचार्जमध्ये मोबाईल सेवा सुरू ठेवणे शक्य होत होते. मात्र, आता किमान रिचार्जची रक्कम मोठ्या प्रमाणात वाढल्याने अनेकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ज्यांना इंटरनेट डेटा कमी प्रमाणात वापरायचा असतो, त्यांनाही केवळ मोबाईल सेवा सुरू ठेवण्यासाठी जास्त रकमेचा रिचार्ज करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

याशिवाय, डेटा पॅक आणि नियमित रिचार्ज वेगवेगळे घ्यावे लागत असल्याने




खर्चात आणखी वाढ होत असल्याचे ग्राहक सांगत आहेत. वेळेवर रिचार्ज न केल्यास येणारे कॉलही बंद होतात, त्यामुळे मोबाईल सेवा कायम ठेवण्यासाठी ग्राहकांना वाढीव रक्कम खर्च करणे अपरिहार्य ठरत असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, वाढत्या रिचार्ज दरांमुळे सामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि अल्प उत्पन्न गटातील ग्राहकांवर आर्थिक ताण वाढत असल्याचे सांगत सरकारने या प्रश्नात लक्ष घालावे, दूरसंचार कंपन्यांच्या रिचार्ज धोरणाचा आढावा घ्यावा आणि सर्वसामान्यांना परवडणारे किमान रिचार्ज उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, अशी मागणी विविध स्तरांतून पुढे येत आहे.

# मुंबईतील निकृष्ट रस्ता काँक्रिटीकरणाची चौकशी करा; ठेकेदारांना काळ्या यादीत टाका – यशवंत विचले यांची सरकारकडे मागणी

**मुंबई : मुंबईतील रस्ता काँक्रिटीकरणाच्या कामांमध्ये झालेल्या कथित निकृष्ट दर्जाच्या कामांची स्वतंत्र तांत्रिक चौकशी करून संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माहीम विधानसभा निरीक्षक यशवंत विचले यांनी उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

निवेदनात म्हटले आहे की, शासनाने मुंबई खड्डेमुक्त करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेले रस्ता काँक्रिटीकरण अभियान जनहिताचे असले तरी दादरमधील डॉ. मोहन आगाशे पथ, खेड गल्ली, भवानी शंकर रोड तसेच अन्य काही रस्त्यांवरील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचा आरोप आहे. काम पूर्ण होऊन काही महिन्यांतच रस्त्यांवर भेगा पडणे, काँक्रिटचा थर उखडणे आणि पृष्ठभाग खराब होणे अशा तक्रारी समोर आल्याचे विचले यांनी नमूद केले आहे.



या प्रकरणात संबंधित ठेकेदारांनी तांत्रिक निकष व गुणवत्तेच्या मानकांचे पालन केले नसल्याची शक्यता व्यक्त करत, सर्व कामांची स्वतंत्र चौकशी करावी, दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करावी, संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत समाविष्ट करावे. तसेच दोषपूर्ण रस्त्यांची दुरुस्ती त्यांच्या खर्चाने तातडीने करून घ्यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. मुंबईकरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी अपेक्षाही विचले यांनी व्यक्त केली.

## ७ सप्टेंबरला नवी मुंबई महापालिकेचा लोकशाही दिन; अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २१ ऑगस्ट

नवी मुंबई : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा लोकशाही दिन सप्टेंबर महिन्यात ७ सप्टेंबर २०२६ रोजी महापालिका मुख्यालयात होणार आहे. या लोकशाही दिनासाठी नागरिकांनी विहित नमुन्यात दोन प्रतींमध्ये अर्ज २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांच्या नावे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकशाही दिनासाठीचा अर्जाचा नमुना महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून बेलापूर येथील महापालिका मुख्यालयाच्या जनसंपर्क विभागातही तो विनामूल्य मिळणार आहे. अर्ज वैयक्तिक स्वरूपाचा, एकाच विभागाशी व एकाच विषयाशी संबंधित असावा. संबंधित प्रकरणाबाबत यापूर्वी विभाग कार्यालय किंवा विभागप्रमुखांकडे निवेदन दिलेले असणे आवश्यक आहे. न्यायप्रविष्ट, महसूल अपील, सेवाविषयक व आस्थापना विषयक अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच विहित नमुन्यात नसलेले किंवा आवश्यक कागदपत्रांशिवाय सादर केलेले अर्ज स्वीकारले जाणार नसल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

## महत्त्वाच्या घडामोडी.....

### पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री पदाची ऑफर....

**भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी निवृत्तीचा विचार करत असल्याचे वक्तव्य केल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने त्यांना भाजप सोडून पक्षात येण्याचे आणि महाराष्ट्राच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होण्याचे आवाहन केले आहे. या प्रस्तावामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.**

### RBI च्या पतधोरण बैठकीकडे देशाचे लक्ष ...

**रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची (MPC) बैठक सुरू झाली असून ५ ऑगस्ट रोजी रेपो दराबाबत निर्णय जाहीर होणार आहे. तज्ज्ञांच्या मते, यावेळी रेपो दरात बदल होण्याची शक्यता कमी आहे.**

### ITI प्रवेशाची चौथी फेरी जाहीर.....

**महाराष्ट्रातील आयटीआय प्रवेश प्रक्रियेची चौथी गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी ५ ऑगस्टपर्यंत प्रवेश निश्चित करावा, असे कौशल्य विकास विभागाने आवाहन केले आहे.**

### गणेशोत्सव तयारीला वेग.....

**राज्यभर गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळांची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली असून सुरक्षा, वाहतूक आणि स्वच्छतेबाबत स्थानिक प्रशासनाने नियोजन सुरू केले आहे.**
**मुंबईतील रस्ते दुरुस्तीवर भर पावसामुळे पडलेल्या खड्ड्यांच्या पार्श्वभूमीवर मुंबईसह प्रमुख शहरांमध्ये रस्ते दुरुस्तीची कामे युद्धपातळीवर सुरू असून संबंधित यंत्रणांना तत्काळ काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**

### रक्षाबंधनानिमित्त बाजारपेठांमध्ये गर्दी.....

**रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रमुख बाजारपेठांमध्ये राख्या, मिठाई आणि भेटवस्तूंच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे.**

### CJP निवडणुका लढणार....

**येणाऱ्या पुढील काळात येणाऱ्या निवडणुका आम्ही निवडणुका लढवण्याच्या तयारीत आहोत.असे सी जे पी नेते अभिजित दीपके यांनी सांगितले.त्यामुळे देशासह राज्यात तरुणांच्या मताचे विभाजन कसे टाळता येईल हा प्रश्न आता सर्व राजकीय पक्षांना पडला आहे.**

# कोयना पुनर्वसित समाजाचा मानवतेला सलाम; भव्य रक्तदान शिबिरातून जीवनदानाचा संदेश

नवी मुंबई(अजित जगताप) : महाराष्ट्राच्या विकासासाठी कोयना धरण प्रकल्पामुळे आपल्या जमिनी, घरे आणि संसाराचा त्याग केलेल्या कोयना पुनर्वसित समाजाने पुन्हा एकदा समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले. अखिल कोयना पुनर्वसाहत समाज सेवा संघ (रायगड-ठाणे-पालघर) यांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती, लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि मैत्रीदिनाचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला.



राज्यातील गरजू रुग्णांसाठी एक हजार रक्तपिशव्या संकलित करण्याचा संकल्प संघाने केला असून, या उद्दिष्टपूर्तीसाठी पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. "मैत्री म्हणजे अनोळखी व्यक्तीच्या जीवासाठीही धावून जाणे" हा संदेश देत अनेक तरुणांनी रक्तदानासाठी जनजागृती केली.

रक्तदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन नागरिकांना प्रेरित केले. रक्तदानामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळतेच, शिवाय रक्तदात्याच्या आरोग्यासाठीही त्याचे सकारात्मक फायदे असल्याची माहिती देण्यात आली.

महाराष्ट्राला पाणी आणि वीज देण्यासाठी मोठा त्याग करणाऱ्या कोयना पुनर्वसित समाजाने आज रक्तदानाच्या माध्यमातून मानवतेची सेवा करण्याचा आदर्श घालून दिला.

या समाजोपयोगी उपक्रमाच्या यशस्वितेसाठी संघाचे सर्व पदाधिकारी, स्वयंसेवक, रक्तदाते आणि सहकार्य करणाऱ्या सर्वांचे विशेष योगदान लाभले.

## मोरबे धरण 80.30 टक्के भरले

**नवी मुंबई:** मोरबे धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत असून, धरण रविवारी सकाळपर्यंत ८०.३० टक्के भरले आहे. मान्सूनच्या सुरुवातीपासून धरण परिसरात सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे धरणातील जलसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. परिणामी नवी मुंबई शहरातील लाखो नागरिकांच्या पाणीपुरवठ्याबाबतची चिंता मोठ्या प्रमाणात दूर झाली आहे. शनिवारी दिवसभरात मोरबे धरण परिसरात ४३ मिमी पावसाची नोंद झाली. तर १ जूनपासून आजपर्यंत एकूण २५०८.८ मिमी पाऊस झाला आहे. सध्या धरणाची पाणीपातळी ८३.९८ मीटर इतकी असून धरणातील एकूण जलसाठा ८०.३० टक्के इतका झाला आहे. धरण ८८ मीटरला पूर्ण क्षमतेने भरते. यंदाच्या मान्सूनमध्ये जुलै महिन्यापासून पावसाचा जोर कायम राहिल्याने मोरबे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून धरणातील पाणीसाठा सातत्याने वाढत असून, आगामी काळातही पावसाचा जोर कायम राहिल्यास धरण पूर्ण क्षमतेने भरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मोरबे धरणावर नवी मुंबई शहराचा पिण्याच्या पाण्याचा मोठा भार अवलंबून आहे.

त्यामुळे धरणातील वाढता जलसाठा हा नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनासाठी तसेच नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक ठरत आहे. पुरेसा जलसाठा उपलब्ध झाल्याने पाणी चिंता मिटली.

## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या क्रीडा पुरस्कारांची घोषणा

### रणजित दळवी, सुनील लवाटे, जान्हवी मुळे आणि स्वदेश घाणेकर यांचा सन्मान

**मुंबई :** मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे क्रीडा पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत दरवर्षी दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या क्रीडा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदा २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांसाठी ज्येष्ठ व युवा गटातील चार पत्रकारांची पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे.

कै. महेश बोबाटे ज्येष्ठ क्रीडा पत्रकार पुरस्कार २०२५ साठी ज्येष्ठ क्रीडा पत्रकार रणजित दळवी, तर २०२६ साठी सुनील लवाटे यांची निवड झाली आहे. तसेच कै. आत्माराम मोरे युवा क्रीडा पत्रकार पुरस्कार २०२५ साठी बीबीसीच्या जान्हवी मुळे, तर २०२६ साठी स्वदेश घाणेकर यांची निवड करण्यात आली आहे.

प्रत्येक पुरस्कारामध्ये रु. १० हजार रोख, गौरवचिन्ह आणि सन्मानपत्र देण्यात येणार आहे. ही माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. ८४ वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेल्या मुंबई मराठी पत्रकार संघाचा हा क्रीडा पुरस्कार उपक्रम यंदा नवव्या वर्षात प्रवेश करत असून, पुरस्कार विजेत्यांना विशेष समारंभात मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

# सातारा जिल्हा बँक निवडणुकीत महायुतीतच अंतर्गत रस्सीखेच; 'एकला चलो रे'ची रणनीती चर्चेत

सातारा(अजित जगताप) : सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ५ ऑगस्टपर्यंत सोसायट्यांचे ठराव घेण्याची मुदत असल्याने विविध गटांकडून मतदारांचे ठराव मिळवण्यासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. यंदाच्या निवडणुकीत महायुतीतील घटक पक्षांमध्येच अंतर्गत स्पर्धा वाढल्याने 'एकला चलो रे' ची भूमिका अधिक ठळकपणे दिसून येत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

जिल्हा बँकेवर वर्चस्व मिळवण्यासाठी विविध राजकीय गटांकडून स्वतंत्र रणनीती आखली जात असून, भाजपमधील काही नेते स्वबळावर सत्ता स्थापनेच्या तयारीत असल्याचे चित्र आहे. सहकार क्षेत्रातील नव्या नियमांनुसार सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्यांना मुदतवाढ नाकारण्यात आल्याने अनेक विद्यमान संचालकांची



समीकरणे बदलली आहेत. त्यामुळे काही ठिकाणी नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार मनोज घोरपडे, आमदार महेश शिंदे, डॉ. अतुल भोसले, आमदार धैर्यशील कदम यांच्यासह अनेक दिग्गज नेते निवडणुकीच्या घडामोडींमध्ये सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. विविध प्रवर्गांतील जागांवर उमेदवारीसाठीही जोरदार हालचाली सुरू असून इच्छुकांची संख्या वाढली आहे.

दरम्यान, ठरावांच्या राजकारणामुळे सहकाराच्या मूळ मूल्यांना तिलांजली मिळत असल्याची खंत अनेक ज्येष्ठ सभासद व्यक्त करत आहेत. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, किसनवीर यांसारख्या सहकार नेत्यांच्या विचारांऐवजी सत्तेच्या समीकरणांना प्राधान्य दिले जात असल्याची टीकाही होत आहे. ठेवीदार व सभासदांनी मात्र बँकेत पारदर्शक कारभार, लोकहिताचे निर्णय आणि गुणवत्ता आधारित कर्मचारी भरती व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# आगरी सेनेच्या संघटन विस्ताराला बळ

## केशव तरे तालुकाप्रमुख, ओंकार तरे शहरप्रमुख तर विशाल हिसाळके युवा शहरप्रमुख

कर्जत : आगरी समाजाचे नेते स्व. राजाराम साळवी यांच्या विचारांचा वारसा जपत संघटनबांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने ठाणे येथील गडकरी रंगायतन नाट्यगृहात आगरी सेनेचा नियुक्ती सोहळा उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमात आगरी सेना प्रमुख प्रदीप साळवी यांच्या नेतृत्वाखाली आणि रायगड जिल्हा प्रमुख सचिन मते यांच्या हस्ते केशव बबन तरे यांची आगरी सेना कर्जत तालुका प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली.

तसेच ओंकार तरे यांची आगरी सेना नेरळ शहरप्रमुख म्हणून पुनर्नियुक्ती करण्यात आली, तर विशाल हिसाळके यांची युवा आगरी सेना नेरळ शहरप्रमुख म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली.

यावेळी आगरी सेना प्रमुख प्रदीप साळवी, युवा आगरी सेना प्रमुख राहुल साळवी तसेच महिला आघाडी प्रमुख मनीषा पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी संघटना तळागाळापर्यंत अधिक सक्षम करण्यासाठी, युवकांना संघटनेशी जोडण्यासाठी तसेच आगरी समाजाच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनी सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नूतनीकृत 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण

प्रतिनिधी : मुंबईतील नूतनीकृत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. अत्याधुनिक सुविधा आणि नव्या स्वरूपात सज्ज झालेल्या या नाट्यगृहामुळे मराठी नाट्य, लोककला आणि सांस्कृतिक चळवळीला नवी ऊर्जा मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या लोकार्पण सोहळ्याला विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रसाद लाड, कालिदास कोळंबकर, अमित साटम, प्रकाश सुर्वे, मुंबईच्या महापौर ऋतु तावडे, उपमहापौर संजय घाडी, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने



उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि सांस्कृतिक योगदानाचा गौरव करत, हे नाट्यगृह त्यांच्या विचारांचा वारसा जपणारे आणि नवोदित कलाकारांसाठी प्रेरणादायी सांस्कृतिक केंद्र ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# सुनिर्मल फाऊंडेशनचा उपक्रम : धारावीतील १०० हून अधिक विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

मुंबई : शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुनिर्मल फाऊंडेशन, धारावी यांच्या वतीने गणेश विद्यालय, धारावी येथे १०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. वह्या, पुस्तके, पेन, कंपास बॉक्स आदी साहित्याचे वितरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते राजेश खंदारे, ज्येष्ठ पत्रकार शशिकांत सावंत, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. प्रा. जे. आर. केळुसकर, ॲड. सुनील शिर्के, डॉ. रेवती आळवे, श्रद्धा तेंडुलकर, संपादक दिलीप शेडगे, दिलीप गाडेकर, गिरीराज शेरखाने, शब्दश्री विलास देवळेकर तसेच फाऊंडेशनचे कार्यप्रमुख दत्ता खंदारे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शब्दश्री विलास देवळेकर यांनी प्रेरणादायी गीतांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला. यावेळी मान्यवरांनी शिक्षण, वाचनसंस्कृती आणि जबाबदार नागरिकत्वाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. याच प्रसंगी सुनिर्मल फाऊंडेशनचे संस्थापक सदस्य तथा साप्ताहिक 'भगवे वादळ'चे संपादक दत्ता खंदारे यांचा कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भावेश खंदारे, मंगेश गायकवाड, पूर्वा खंदारे, विशाल नारायणे आणि सर्व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एक सुनेहरी शाम' संगीत मैफिलीत के. रवि दादांचा विशेष पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी : मुंबईतील अंधेरी येथील प्रतिष्ठित मेयर हॉलमध्ये संध्या विकास सरदाना म्युझिक इव्हेंट्सतर्फे आयोजित 'एक सुनेहरी शाम – मुंबई में सितारों के नाम' हा संगीतमय कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला भजनसम्राट पद्मश्री अनुप जलोटा, प्रख्यात संगीतकार दिलीप सेन आणि के. रवि दादा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात पद्मश्री अनुप जलोटा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी अनेक उदयोन्मुख गायक-गायिकांनी आपल्या सुरेल सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. सहभागी सर्व कलाकारांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजक विकास सरदाना आणि संध्या सरदाना यांनी आपल्या गुरू पद्मश्री अनुप जलोटा यांच्या मार्गदर्शनातून हा उपक्रम साकार झाल्याचे सांगितले. अनुप जलोटा यांनी आयोजकांचे कौतुक करत, अशा व्यासपीठातून भविष्यातील कलाकार घडतात, असे मत व्यक्त केले.

यावेळी संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल के. रवि दादा यांचा विशेष पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. सन्मान स्वीकारल्यानंतर त्यांनी विकास सरदाना यांच्या नवोदित कलाकारांसाठीच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

कार्यक्रमाला केसीएफ फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्ण चौहान यांच्यासह अनेक मान्यवर आणि संगीतप्रेमी उपस्थित होते. अनुप जलोटा, दिलीप सेन तसेच संध्या आणि विकास सरदाना यांच्या सादरीकरणाने संगीतप्रेमींना मंत्रमुग्ध केले. या संस्मरणीय संगीत संध्याकाळी उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आयोजकांचे अभिनंदन केले.

# कराड रबर बॉल चॅम्पियन ट्रॉफी २०२६ : खेळाडू लिलाव सोहळा उत्साहात संपन्न

नवी मुंबई : कराड दक्षिण रहिवासी संघ, नवी मुंबई (रजि.) आयोजित कराड रबर बॉल चॅम्पियन ट्रॉफी २०२६ (पहिले पर्व) स्पर्धेचा खेळाडू लिलाव सोहळा रबाळे येथील एका हॉटेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे कराड तालुक्यातील कराड तालुका क्रिकेट असोसिएशन, कराड ग्रामीण क्रिकेट असोसिएशन आणि कराड दक्षिण क्रिकेट असोसिएशन या तिन्ही संघटना प्रथमच एकत्र येऊन स्पर्धेचे नियोजन करत आहेत.

सोहळ्यात कराड दक्षिण रहिवासी संघाचे संस्थापक-अध्यक्ष दिपक (दादा) लोखंडे यांची लंडन दौऱ्यामुळे अनुपस्थिती जाणवली. मात्र मोहनराव नायकवडी आणि बाबासो बागल यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

स्पर्धेच्या ट्रॉफीवर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांची प्रतिमा साकारण्यात आली असून, ही ट्रॉफी कराड ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे संस्थापक मोहनराव नायकवडी यांच्या सौजन्याने देण्यात आली. ट्रॉफीची संकल्पना असोसिएशनचे अध्यक्ष अमितराज चव्हाण यांची असून, त्यांच्या या अभिनव कल्पनेचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.




Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/ ६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)